पणन हंगाम २०१६-१७ मधील खरेदी करण्यात आलेल्या तथापि भरडाईविना शिल्लक धानाची जाहीर ई-लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: खरेदी - १०१७ /प्र.क्र.२२८/ ना.पु.२९
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
तारीख :- ०४ जानेवारी, २०१८

वाचा :- भारतीय अन्न महामंडळ यांचे पत्र क्रमांक Com, Proc/CMR-Corresp/२०१६-१७/RO(M) दिनांक १२.१२.२०१७.

प्रस्तावना:-

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०१६-१७ मध्ये मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळ या दोन अभिकर्ता संस्थांमार्फत धानाची खरेदी पुढीलप्रमाणे झालेली आहे.

अ.क्र.	अभिकर्ता संस्था	धान (क्विंटलमध्ये)
१	मार्केटिंग फेडरेशन	**२९,११,८६२.७२**
२	आदिवासी विकास महामंडळ	**१६,९७,२२३.९७**
	एकूण	**४६,०९,०८६.६९**

केंद्र शासनाने पणन हंगाम २०१६-१७ करीता धान भरडाईची वाढीव मुदत दिनांक ३०.११.२०१७ अखेरपर्यंत दिली होती. सदर हंगामाकरीता दोन वेळा मुदतवाढ मिळाली आहे. त्यामुळे भरडाईविना शिल्लक असलेला सुमारे १ लाख ४ हजार क्विंटल धान साठा केंद्रीय साठयामधून वगळला गेला असल्याने, या साठ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी आता राज्य शासनाची आहे.

यास्तव, पणन हंगाम २०१६-१७ मधील खरेदी करण्यात आलेल्या व भरडाईविना शिल्लक असलेल्या धानाची जाहिर ई-लिलावाद्वारे विक्री करून विल्हेवाट लावण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय

पणन हंगाम २०१६-१७ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या व भरडाईविना शिल्लक असलेल्या धानाची जाहीर ई-लिलावाद्वारे विक्रीची संपूर्ण प्रक्रिया " जेथे आहे व जसे आहे" या तत्वावर करण्यासाठी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	
१	नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा	अध्यक्ष
२.	उप आयुक्त (पुरवठा), कोकण	सदस्य
३.	संबधित जिल्हयांचे जिल्हा पुरवठा अधिकारी	सदस्य
४.	वित्तीय सल्लागार व उप सचिव/ उपसंचालक	सदस्य -सचिव

२. सदरहू **समितीची कार्यकक्षा** पुढीलप्रमाणे राहील.

१) सदरहू धानाची संपूर्ण विक्री प्रक्रिया जाहीर निविदांद्वारा उपरोक्त समितीद्वारा करण्यात यावी.

२) ही संपूर्ण प्रक्रिया ई-निविदा पद्धतीचा अवलंब करुन करावी. याकरीता ई-निविदेसाठी नोंदणी करणे, नोडल ऑफिसर नेमणे ई.संपूर्ण पूर्व तयारी करावी.या धान विक्रीसाठी राज्यस्तरीय मराठी व इंग्रजी वर्तमान पत्रात मोठया प्रमाणात प्रसिद्धी दयावी व निविदा भरण्यासाठी आवश्यक कालावधी किमान ७ दिवस ठेवावा.

३) धानापैकी गोदामात साठवणूक केलेला तसेच गोदामाबाहेर ठेवलेल्या साठयाच्या स्वंतत्र यादया निविदेसोबत ठेवण्यात याव्यात.

४) ई-निविदा काढताना प्रत्येक गोदाम वेगळे समजून गोदाम निहाय स्वतंत्र ई-निविदा काढण्यात यावी.

५) निश्चित केलेली अनामत रक्कम व सुरक्षा ठेव यांचा स्पष्ट उल्लेख निविदेमध्ये करावा व त्याचा डिमांड ड्राफ्ट प्राप्त करुन घ्यावा.

६) अटी/शर्तीमध्ये पात्र होणाऱ्या व जास्तीत जास्त दर देणाऱ्या खरेदीदाराचे दर अपेक्षित किंमती एवढे (Upset Price) किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास त्यास समितीने मान्यता दयावी.

७) निविदा प्राप्त झाल्यानंतर ज्या निविदाकाराचे दर मंजूर होतील, त्या निविदा धारकांस समिती अध्यक्षांमार्फत निविदा स्वीकृतीबाबतचे पत्र देण्यात येईल व निविदेत नमूद केलेल्या दरानुसार तसेच धानाच्या परिमाणानुसार होणाऱ्या रक्कमेचा मुंबई येथे देय असलेला धनाकर्ष, वित्तीय सल्लागार व उपसचिव , अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या नावे प्राप्त करुन घेतील.

८) निविदा प्रक्रियेचा तसेच विक्रीचा दैनंदिन अहवाल व प्राप्त धनाकर्ष यांची माहिती सदस्य सचिव यांनी तयार करावी.

९) इच्छूक खरेदीदारास धानाची पाहणी करावयाची असल्यास त्यांनी संबंधित जिल्हयांच्या जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

१०) निविदाकार एका ठिकाणच्या संपूर्ण साठयाकरीता किंवा एकापेक्षा अधिक ठिकाणच्या संपूर्ण साठयाकरीता निविदा सादर करु शकतील. परंतू निविदेतील दर कोणत्याही अटीशी निगडीत असू नयेत.

११) साठा असेल तेथून धानाची उचल,वाहतूक व हमाली इत्यादीकरीता संपूर्ण खर्च खरेदीदारानेच करावयाचा आहे.

१२) खरेदीदारास धान खरेदी, साठवणूक व त्याची विल्हेवाट याबाबत राज्य /केंद्र शासन अथवा इतर शासकीय संस्थांचे आवश्यक परवाने प्राप्त करुन घ्यावे लागतील. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी खरेदीदाराची राहील. यासंदर्भात राज्य शासन कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

१३) धानाच्या संपूर्ण परिमाणाची संपूर्ण रक्कम साठा उचलण्यापूर्वी भरावी लागेल.

१४) ज्या खरेदीदाराचे दर मंजूर होतील तसे त्यांना लेखी कळविण्यात येईल. तसे लेखी कळविल्यापासून संबंधितांनी ७ दिवसांच्या आत सुरक्षा रक्कम भरणे आवश्यक आहे. व संपूर्ण साठा ३० दिवसांच्या आत उचलणे बंधनकारक राहील. जर विहित मुदतीमध्ये धान खरेदीकर्त्याने धान उचल न केल्यास तसेच इतर सर्व अनुषंगिक बाबींकरिता शास्ती लावण्याची तरतुद ई-लिलावाच्या अटी व शर्तीमध्ये करणे अपेक्षित आहे.

१५) एकदा दर सादर केल्यानंतर त्यात कोणतेही बदल अनुज्ञेय राहणार नाहीत. दर सादर करुन विहित मुदतीत सुरक्षा रक्कम न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१६) उपरोक्त गठित समितीस अंतिम निर्णय घेण्याचे सर्वाधिकार प्रदान करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कोणतेही कारण न देता ई-निविदा अंशत:/पूर्णत: मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार गठित समितीस असेल.

१७) हंगाम २०१६-१७ मधील भरडाईविना शिल्लक धानाची विक्री प्रक्रिया हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पूर्ण करावी. सदर धानाची ई-लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री केल्यानंतर प्राप्त होणारी रक्कम वित्तिय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांच्या स्विय प्रपंजी लेख्यामध्ये (PLA) जमा करावी.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८०१०४१६४६५३२१०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2018.01.04 16:51:01 +05'30'

(सतीश सुपे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
२. अप्पर मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
३ अप्पर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
५. प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
६ प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई,
७ सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई,
८ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि., कनमूर हाऊस,नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई- ४०० ००९,
९ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी विकास भवन, २ रा माळा, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड,नाशिक-२,
१० विभागीय आयुक्त, कोकण व नागपूर विभाग
११ नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा(गो/वा),मुंबई,
१२ जिल्हाधिकारी(ठाणे, सिंधुदुर्ग, कोल्हापूर,गडचिरोली व गोंदिया)
१३ उप आयुक्त (पुरवठा), कोकण व नागपूर विभाग
१४ जिल्हा पुरवठा अधिकारी, (ठाणे, सिंधुदुर्ग, कोल्हापूर,गडचिरोली व गोंदिया)
१५ जिल्हा मार्केटिंग अधिकारी, (ठाणे, सिंधुदुर्ग, कोल्हापूर,गडचिरोली व गोंदिया)
१६ जिल्हा कोषागार अधिकारी, (ठाणे, सिंधुदुर्ग, कोल्हापूर,गडचिरोली व गोंदिया)
१७ प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ , (ठाणे, सिंधुदुर्ग, कोल्हापूर,गडचिरोली व गोंदिया)
१८ जिल्हा कृषि अधिकारी, (ठाणे, सिंधुदुर्ग, कोल्हापूर,गडचिरोली व गोंदिया)
१९ वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
२० उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.
२१ सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी,अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग,मंत्रालय विस्तार, मुंबई,
२२ सर व्यवस्थापक,(महा.) भारतीय अन्न महामंडळ, ५ वा माळा, राजेंद्र नगर, दत्तपाडा रोड, बोरीवली (पूर्व) मुंबई-६६.
२३ महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),
२४ ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, ६ वा मजला, विधान भवन,मुंबई. (१०प्रती)
२५. निवड नस्ती (नापु-२९).